# एक राष्ट्र, एक भाषा, एक संगीत

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - अक्षर दिवाळी१९८६, संपा. प्र ना परांजपे, रेखा इनामदार-साने, कमल देसाई, सुधीर बेडेकर, शिरीष सहस्रबुद्धे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८६)

खंडप्राय देशात नेहमी आज ना उद्या घडून येणारी गोष्ट म्हणजे समाजाचा एकसंधपणा नाहीसा झाला, असे प्रकर्षाने जाणवू लागते. तसे पाहता समाज कधीही एकसंध असतो, असे मानण्यास जागा नाही. वर्णव्यवस्था ते वर्गव्यवस्था सर्व पायऱ्या समाजाच्या बहुसंधतेमुळेच अनिवार्य ठरलेल्या आहेत. पण तरीही बहुसंध समाजाने आपल्या वाटचालीत दहा तोंडे दहा दिशांना फिरवली आहेत, असे सहसा दिसत नाही, निदान एका राष्ट्रात समाविष्ट असलेल्या समाजात तसे आढळत नाही. परिचयाच्या बाबी घेऊनच बोलायचे, तर समाज बहुसंध असला, तरी संरक्षण, व्यापार, धान्योत्पादन, इत्यादी बाबतींत त्याचा व्यवहार सर्वसंमतीने चालला आहे, असा ढोबळ प्रत्यय येत असतो. असे घडणे एकदिल, एकात्म राष्ट्राबाबत शक्य असते. तसे व्हायलाच हवे. नाहीतर राष्ट्राचे अस्तित्व धोक्यात येते. एकात्मतेची भाषा पुन्हापुन्हा होऊ लागली, की तिचा अभाव जाणवतो आहे आणि परिणामतः आपले अस्तित्व धोक्यात आल्याची चाहूल लागलेला समाज भयाने चीत्कार करू लागला आहे, असे खुशाल समजावे!

आज भारताच्या इतिहासात अशीच वेळ आलेली दिसते, समित्या, परिसंवाद, शिबिरे, चर्चामंडळे, जाहिराती, संदेश आणि उपदेश, इत्यादी अनेक मार्गांनी अस्तित्वाचे आसन डळमळू नये, म्हणून प्रयत्न होत आहेत. संकटकाळी कोणताच मार्ग त्याज्य नसतो, हे ध्यानात घेता साहित्य व संस्कृती, कला आणि कारागिरी यांचाही उपयोग एकात्मता साधण्यासाठी का करू नये, असेही वाटल्याशिवाय राहिले नाही.

शासनाच्या प्रेरणेने आता उत्तर-दक्षिण संगीत, नृत्य, नाट्य, इत्यादी आविष्कारांना एकात्म करून मांडण्याने एकात्मता साधेल, अशा विश्वासातून प्रयत्न होत आहेत.

तसे पाहता इतिहासाच्या डोळ्याला १९१६ सालचे बडोदे दिसू लागते. राष्ट्रवादाचा सर्व वातावरणात संचार झालेला. भारताचे आहे ते सर्व अनन्यसाधारण आहे आणि पाश्चात्त्य संस्कृतीत जे घडू शकते, ते सर्व आमच्याकडेही घडू शकते, अशा दोन्ही ओढींचे तणाव घेऊन सर्व व्यवहार सिद्ध होत होते. आमचे संगीत इतके सूक्ष्म, की त्याचे नोटेशन कसे होणार, असा एक अभिमानी प्रश्न, तर दुसरीकडे नोटेशनद्वारा संगीत शिकवता येते, एवढेच नव्हे, तर स्टाफ नोटेशनप्रमाणे पद्धती बसवून त्यात भारतीय संगीत बँडवर वाजू शकणाऱ्या रचनाही लिहिता येतात, हे सिद्ध करण्याचा सक्रिय खटाटोप! याच प्रक्रियेतून भोवताली दरवळणाऱ्या राष्ट्रवादी विचारसरणीचा छाप घेऊन एक समीकरण तयार होत होतेः

**एक राष्ट्र = एक भाषा = एक संगीत:**

**पं. भातखंडे यांचे प्रयत्न**

पं. भातखंड्यांसारखा मर्मज्ञ आणि सयाजीराव गायकवाडांसारखा जाणकार आश्रयदाता एकत्र येऊन बडोद्याला अखिल भारतीय संगीत परिषदेचा घाट घातला गेला आणि परिषदेची ध्येयधोरणे ठरविताना जमल्यास भविष्यात एक राष्ट्रीय शास्त्रोक्त संगीत

©DR ASHOK DA RANADE MEMORIAL TRUST 

पद्धती रूढ होण्याची पूर्वतयारी हाही उद्देश त्यांनी नोंदविला! हे कसे घडू शकले? १९१० च्या आधी, म्हणजे शास्त्रीय संगीताची आपली पद्धती कोणती, याचा निर्णय घेण्याआधी पं. भातखंड्यांनी दक्षिणेचा दौरा केला होता, तिथल्या कलाकारांची गाणी ऐकली होती. त्यांवर मार्मिक भाष्ये केली होती व त्यांचा निष्कर्ष साफ होता. हिंदुस्थानी व दाक्षिणात्य संगीतपद्धती भिन्न आहेत, मूलतः! तरीही त्यांनी उद्दिष्टांत आधी निर्देश केलेल्या समीकरणास मान का तुकवावी? इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, इटली, इत्यादी सर्व राष्ट्रांस शास्त्रीय संगीताची एक-एक पद्धती असते. म्हणून आपल्या देशातही तसे असायला हवे, तेच योग्य, असा गैरसमज का झाला असावा? बहुविधतेत एकविधता या भारतीय वैशिष्ट्याचा असा काहीसा विचित्र अर्थ लावण्यामागे तेव्हाच्या राष्ट्रवादी भूमिकेचा सरळसोट दृष्टिकोण होता. आजही तशीच चूक पुन्हा होताना दिसते आहे!

**संगीत-पद्धतीचा विकास**

चूक भाबडेपणाची आहे. म्हणजे हेतू स्तुत्य आहे. पण प्रस्तुत वास्तवाची जाण बरोबर नाही. भारत हा एकच देश जगाच्या पाठीवर असा आहे, की जिथे विकसित अशा दोन शास्त्रोक्त संगीतपद्धती अस्तित्वात आहेत. सुमारे अकराव्या शतकापासून या दोन पद्धतींची रसायने सिद्ध होत होत पंधराव्या शतकात दोहोंचे भिन्न मार्ग निश्चित झाले. याच सुमारास देशी भाषा व वाङ्मयीन परंपराही आकाराला येत होत्या, प्रदेशसीमा ठरत होत्या, प्रदेशांच्या आपापल्या उपसंस्कृतीही घाट घेत होत्या. आज परिस्थिती निराळी आहे का? किंबहुना ती निराळी होऊ नये, याची इतर सर्व बाबतींत आपण कसोशीने काळजी घेत आहोत आणि संगीतात मात्र एकात्मता दिसावी, म्हणून धडपडत आहोत, असे दिसते आहे! प्रादेशिक सीमा निश्चित व्हाव्यात, म्हणून आपले वाद हिरिरीने चालू आहेत, भाषिक व वाङ्मयीन परंपरा निराळ्या आणि 'श्रेष्ठतम' कशा, याचेही भान निर्माण करण्यासाठी जिवाचा आटापिटा ते ते भाषक करीत आहेत. प्रादेशिक संस्कृतीचा उदोउदोही नेहमीचे दृश्य झाले आहे... आणि त्याच वेळी शास्त्रोक्त संगीतांना मात्र एकत्र आणावे, आणता येते, इत्यादी हाकाटी का केली जाते? संगीताच्या स्वरूपाचे ज्ञान नसलेले लोकच अशा प्रकारच्या प्रयत्नांत वेळ घालवितात, एवढीच एक गोष्ट समाधानाची आहे!

मुद्दा असा, की विनिमय-साधन म्हणून ज्यांचा उपयोग होत नाही, त्या सर्व गोष्टींना निरनिराळी रूपे धारण करण्याचे स्वातंत्र्य व सामर्थ्य असते. म्हणूनच स्वर, राग, ताल, इत्यादी बाबी नाणी, भाषा, रस्ते यांपेक्षा निराळ्या प्रकारे आकाराला येत असतात.

**नैसर्गिक पण अवघड**

सुरा-तालांची मेळवणी, आलापांचे संतुलन, शब्दोच्चारांचा एक समय, कधी कधी माफक हालचाली वा मुद्राभिनय यांच्याद्वारे पोचता होणारा संदेश एकात्मतेचा खरा, पण तसा अप्रत्यक्ष. एकच आत्मा असलेल्या देहाच्या विविध अवयवांच्या हालचाली निरनिराळ्या होतात, पण त्यांत एक प्रकारची सुसूत्रता असते, तसाच प्रकार समूहगायनांनी होत असतो. पण दैनंदिन जीवनातील, अस्तित्वाशी निगडित बाबींत त्रासदायक ठरणाऱ्या फुटीरपणाशी या सर्वांचा संबंध कसा जुळतो? एका विशिष्ट क्षेत्रातील अनुभवाची विशिष्ट गुणवत्ता दुसऱ्या जीवनक्षेत्रात अवतरणे उपचारक्रियेचा भाग मानल्याशिवाय समूहगायन आणि भावनिक एकात्मता यांचा संबंध गृहीत कसा धरावा? लहानपणापासून अनेक समूहगीते गाण्याचे शिक्षण देणे, दैनंदिन जीवनातल्या पण सर्वसामान्यतः सर्वांच्या जीवनात घडणाऱ्या गोष्टींवरच गाणी रचून घेणे, लोकसंगीतातल्या व म्हणून अनेक प्रदेशांत वगैरे सामान्यतः आढळणाऱ्या चालींचा, कल्पनांचा वापर करून समूहगायन सिद्ध करणे रंजक, महत्त्वाचे आणि सहज साधणारे खरे, पण त्याचा प्रत्यक्ष संबंध एकात्मता इत्यादींशी जोडणे

कल्पनारम्यतेकडे झुकते, फुटीरपणाच्या रोगाचे निदान करून समाजमनावर एकात्मिकतेचे संस्कार करणे हा उपाय नैसर्गिक वाटतो, पण तो सहजसाध्य नाही.

**आविष्कारांची पृथगात्मता**

राष्ट्रवाद, क्रांती, एकात्मता, इत्यादींचा संगीताशी काहीच संबंध नाही, असा वरील विवेचनाचा अर्थ आहे काय? तसे नाही. संगीताचे स्वरूपच असे आहे, की दैनंदिन वास्तव पाहता सुरक्षितपणाची एक झडप आपण बंद करू! एकसंधता म्हणजे एकरूपता नव्हे, याचे भान राखणे जरूर आहे.

संगीताचे स्वरूप समजण्यात गफलत होते म्हटले, म्हणजे काय? एक तर असे, की ती प्रयोगकला आहे. प्रयोगातूनच तिची सिद्धी होत असते. कागदोपत्री रागांची नावे सारखी असली, मान्य ऐतिहासिक पुराव्याप्रमाणे पाहता संगीतप्रकारांची जातकुळी समान वा एक असली, तरीही प्रत्यक्ष प्रयोगात आविष्कार पूर्णतः भिन्न वाटू शकतात, कारण प्रयोगपरंपरा नेहमीच काहीशा निराळ्या मार्गाने आपली गती राखत असते. दुसरे असे, की संगीताप्रमाणेच नृत्य आणि नाट्य याही प्रयोगकला असल्या, तरीही संगीत प्रतिरूपात्म नसते. जीवनातील घटना, परिस्थिती, समस्या वा संकेत यांच्या प्रतिनिधित्वाची भूमिका नृत्य वा नाट्य यांना बजावावी लागते. शास्त्रोक्त संगीतावर ती जबाबदारी नसते. शास्त्रोक्त संगीत जीवनापासून फटकून वावरते, असे म्हटले, तरीही ते फारसे चूक ठरणार नाही! निष्कर्ष असा, की आजच्या फुटीरपणावर उतारा म्हणून शास्त्रोक्त संगीतपद्धतींमधली एकात्मता वगैरे शोधणे पाणी न लागणाऱ्या खड्ड्यात आड बसविण्यासारखे आहे!

अर्थात यामधूनच आणखी एक शक्यता निर्माण होते. शास्त्रोक्त संगीताला विचारातून बाजूला ठेवले, तर? सुगम शास्त्रोक्त, जनप्रिय, लोक, आदिम आणि भक्तिसंगीत इतक्या इतर परंपरा भरभराटीस आलेल्या आहेत. आपण सारे एक आहोत, इत्यादी संदेश पोचविण्यास त्यांचा वापर करता येईल का व कसा? सुगम शास्त्रोक्त म्हणजे मराठी नाट्यसंगीत वगैरे, जनप्रिय म्हणजे भावगीत इत्यादी, लोकसंगीत म्हणजे पोळ्याची वा मंगळागौरीची गाणी, आदिम म्हणजे गोंड, वारली, आगरी, इत्यादिकांची गाणी, तर वारकऱ्यांचे अभंग, आरत्या, स्तोत्रे, इत्यादींचा भक्तिसंगीतात समावेश होतो. यांचा उपयोग एकात्मतेचा संदेश वगैरे देण्यासाठी करणे म्हणजे तशा अर्थाची गाणी रचणे हे फार ढोबळ झाले. हा प्रचार झाला. प्रत्यक्ष वा उघडा-नागडा प्रचार फारसा प्रभावी ठरतो, असा अनुभव नाही. एकात्मतेसाठी धडपडणाऱ्यांचा तसा दावाही नाही. अशा परिस्थितीत अनेकदा मार्ग चोखाळला गेला आहे, तो समूहगीतांचा. आजही त्याचा वापर अधिक प्रमाणावर व्हावा, असे प्रयत्न जारी असतात. याही बाबतीत गीतांचा अर्थ एकात्मतापर वगैरे हवा म्हटल्यास बटबटीत प्रचाराचे तोटे पदरी येण्याची शक्यता जास्त आहे. केवळ एकत्र गाण्यामुळे, अनेक भाषिक, अनेक प्रांतिक व अनेक धार्मिक परंपरांच्या वेगवेगळेपणावर, निदान त्यामधून उद्भवणाऱ्या कडवेपणावर मात व्हावी, अशी अपेक्षा करण्याइतकी संगीताची ताकद असते, असे मानणे योग्य आहे काय?

जीवनात निकडीच्या, ज्वलंत वाटणाऱ्या गोष्टींना त्यात थारा नसतो. शिवाय विविधता, व्यक्तीव्यक्तीला दिले जाणारे स्वातंत्र्य हा संगीताविष्काराचा गाभा असतो. गमतीची बाब अशी, की प्रस्तुत विविधतेचे, व्यक्तिभूत आविष्कारांच्या पृथगात्मतेचे दर्शन घडू लागले, की मात्र काहीशा अमूर्त पातळीवर एकरसतेचा अनुभव येऊ लागतो. गाणारा, गायन व ऐकणारा ही त्रिकुटी लयास जाते! यापेक्षा कमी आध्यात्मिक पातळीवर येणारा अनुभव दोन प्रकारचा असतो, एक खूप आनंदी वगैरे वाटते किंवा उदास, खिन्न वगैरे! म्हणजे अनुभव भावनिक असला, तरी नेमक्या कोणत्याही भावनेचा नसतो, काही कृती करावी, असेही वाटेलच, असे नाही. कलाकाराविषयी कृतज्ञता वाटू शकते, पण तोही आपल्याचसारखा यात्री आहे, अशी जाणीवही राहते. म्हणजे अशा वेगवेगळेपणाची जाणीव हीच अनुभवाची आधारशिला ठरत असते.

निरनिराळ्या संस्कृतिगटांचे संगीत एकच वाटते, ते भारतातल्या विविध भाषांतल्या चित्रगीतांचे श्रवण करताना! पण वास्तविक पाहता तिथे संस्कृतिगटांचे विविधपणही लयास गेलेले असते. तिथे येणारी पावती ओळखीची असते, पसंतीची नाही! पसंती विविधतेला, निराळ्या सुरालाच असते, परप्रांतीयांची खास गाणी ऐकताना बरे वाटते, आपल्या गाण्यांची त्यांनी केलेली नक्कल ऐकताना ओळख पटते व नक्कल पाहिल्याचे दुय्यम समाधान होते. आपला देश एक राष्ट्र असला, तरी सांस्कृतिक संघराज्य आहे, याची जाणीव ठेवली पाहिजे. संगीताबाबत बोलावयाचे, तर वेगळेपणा सन्मानाने टिपावा आणि तो तसा का, हे समजून घेण्याचा प्रयत्न करावा. असा वेगळेपणा टिपताना मानवी प्रतिभेची विविधता लक्षात येते. या विविधपणातच मानवी स्पर्श आढळत असतो, याचीही जाणीव होते. असा मानवी स्पर्श अनेक ठिकाणी जाणवतो व म्हणून मानव सगळीकडे सारखाच, असे वाटते! म्हणजे विविधतेतून एकात्मता जाणवते. साम्यावर भर देऊन एकात्मता साधते, असे मानणे भोळेपणाचे आहे. साम्यावर भर दिल्यास अनुभव समग्रपणे घेण्याकडे दुर्लक्ष होते. साम्य नसले, की विरोध असतो, अशी टोकाची भूमिका घेणे आपल्या हाडीमांसी खिळले आहे. सांस्कृतिक बाबतीत असे बहुधा नसते. साम्य नसले, की वेगळेपण असते आणि त्याकडे लक्ष दिल्याकारणाने साम्यही समजते; पण याचा व्यत्यास खरा होत नसतो!

---